# प्रेसनोट

दि.२८/०७/२०२२

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | शेवगांव पो.स्टे., जि.अहमदनगर गुरनं.५२२/२०२२ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | हरेश्वर रोहिदास सानप, वय–३६ वर्ष, महसूल सहायक, वर्ग–३, तहसिल कार्यालय, शेवगांव, ता.शेवगांव, जि.अहमदनगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | १,००,०००/– रुपये त्यात दोन टप्प्यात ५०,०००/– ५०,०००/– रुपये प्रमाणे तसेच स्वत:च्या घराचे बांधकामाकरीता १ डंपर रेती |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ५०,०००/– रुपये (पहिला हप्ता) |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, तक्रारदार यांचेवर सन २०२० मध्ये शेवगांव पोलीस स्टेशन अहमदनगर येथे रेती चोरी बाबत गुन्हा दाखल झाला होता. त्यावेळी त्यांचा वाळूचा डंपर सदर गुन्हयात जप्त करण्यात आला होता. सदरचा डंपर हा अजून जप्त असल्याने तो परत मिळण्याकरीता तक्रारदार यांनी मा.न्यायालयात अर्ज केला असता त्यावरुन मा.न्यायालयाने तहसिलदार, शेवगांव यांच्याकडून अहवाल मागितला आहे. सदर अहवाल हा तहसिलदार यांचेकडून तक्रारदार यांच्या बाजूने तयार करुन देण्याकरीता आरोपी लोकसेवक हरेश्वर रोहिदास सानप, वय–३६ वर्ष, महसूल सहायक, वर्ग–३, तहसिल कार्यालय, शेवगांव, ता.शेवगांव, जि.अहमदनगर यांनी पंचासमक्ष तक्रारदार यांच्याकडे १,००,०००/– रुपये तसेच आरोपी लोकसेवक सानप यांनी स्वत:च्या घराचे बांधकामाकरीता १ डंपर रेती अशी लाचेची मागणी करुन त्यातील पहिला टप्पा ५०,०००/– रुपये लाचेची रक्कम पंचासमक्ष तक्रारदार यांच्याकडून स्वीकारली असता आरोपी लोकसेवक सानप यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. सदर बाबत शेवगांव पोलीस स्टेशन, जि.अहमदनगर गुरनं.५२२/२०२२ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत,
टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :– acbmaharashtra.gov.in

ई–मेल :– acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार
ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :– १०६४

दुरध्वनी क्रमांक :– ०२४१–२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक:– ९९३०९९७७००

(हरीष खेडकर)
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
अहमदनगर